वर्ष २२ वे

अंक २ रा

**सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण**

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि.०४.०९.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

यांचे मुखपत्र

# संवाद

### वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- **वाय-फाय सुविधा उपलब्ध.**
- **विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका.**
- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले व पार्किंग).
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**ऑगस्ट २०२२**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : १९ ऑगस्ट, २०२२ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.०४.०९.२०२२** रोजी **सकाळी १०.३० वा. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२६.०१.२०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०२१-२०२२ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०२२-२०२३ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०२२-२०२३ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.२४.०८.२०२२** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**✼ आपले नम्र ✼**

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ठुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- डॉ.बाळासाहेब बांडे, सखाराम गागरे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, रामदास शिर्के, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, किरण तिकोने, प्रमोद जगदाळे, राजाराम मुंढे, प्रशांत शिर्के.**

## ✼ कार्यक्रमाचे स्थळ ✼

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,**
मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
**रविवार दि. ०४.०९.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि. ०४.०९.२०२२** रोजी **सकाळी १०.०० वा. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

*** अध्यक्ष ***

**मा. दत्तात्रय तुकाराम ठुबे**

सचीव, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र राज्य (सेवानिवृत्त)

*** प्रमुख पाहुणे ***

**मा.डॉ.बाळासाहेब नाथाजी वाफारे**

सदस्य, पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद (सेवानिवृत्त)
पी.एच.डी. गाईड

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

*** आपले नम्र ***

**हौसाराम घोडके** — अध्यक्ष
**इंजि.विजयकुमार ठुबे** — अध्यक्ष, बांधकाम समिती
**मधुकर शिरोळे** — उपाध्यक्ष
**सुनील पोटे** — सेक्रेटरी
**प्रा.गोरक्ष जगताप** — सहसेक्रेटरी
**बाजीराव जगदाळे** — कार्यवाहक
**अशोक वाबळे** — सहकार्यवाहक

**सदस्य :- डॉ.बाळासाहेब बांडे, सखाराम गागरे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, रामदास शिर्के, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, किरण तिकोने, प्रमोद जगदाळे, राजाराम मुंढे, प्रशांत शिर्के.**

*** कार्यक्रमाचे स्थळ ***

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,**
मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
**रविवार दि. ०४.०९.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

**कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

पाहता पाहता कोरोनाने संपूर्ण जगावर दोन वर्षे राज्य केले व सर्वांचे आर्थिक, मानसिक, भौतिक नुकसान प्रचंड प्रमाणात केले. कित्येत बंधु भगिनी आपल्याला कायमचे सोडून कैलासवासी झाले. तरीही त्यातून आपण सर्वांनी फिनीक्स पक्षासारखी भरारी मारुन गेल्या ५/६ महिन्यात झालेले नुकसान भरून तर काढलेच पण प्रगतीसुद्धा केली. मला वाटते की आता आपली सर्वांचीच गाडी रूळावर आली असून ती आता धावत आहे.

याच पार्श्वभूमीवर आपल्या मंडळाचा या वर्षीचा **'गुणवंत विद्यार्थी व ग्रामस्थांचा गौरव सोहळा' इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,** शिवाजीनगर, पुणे येथे **रविवार, दि. ४ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता** आयोजित केला आहे. त्यास आपण सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, असे विश्वस्थांतर्फे मी आपणास आवाहन करीत आहे. या वर्षी आपल्याच मंडळाचे उच्चशिक्षित सदस्य आपणास पाहुणे म्हणून लाभणार आहेत. कर्जुले हर्या येथील रहिवासी व पुणे विद्यापीठातील गणित विषयातील पी.एच.डी.चे मार्गदर्शक **डॉ.बाळासाहेब वाफारे,** तसेच कान्हुर पठार येथील रहिवासी व नुकतेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातील 'सचिव' या सर्वोच्च पदावरून निवृत्त झालेले **डॉ.दत्तात्रय ठुबे** हे या सोहळ्याचे **प्रमुख पाहुणे** म्हणून आकर्षण राहणार आहे.

पारनेर तालुका ज्ञानाचा खजिना आहे, असे सर्वजण म्हणत असतात. याचा प्रत्यय वेळोवेळी येतच असते. प्रातिनिधीक स्वरूपात नमूद करायचे म्हटले तर पोलीस उपअधीक्षक **श्री.राम पठारे** यांनी पी.एच.डी. संपादन केली आहे. **कु.डॉ.बोध्यांगा केदारे** या मुलीने एम.डी.एस. उत्तीर्ण होताना सुवर्णपदक मिळविले आहे. **कु.वर्षा साबळे** ही यु.पी.एस.सी. परीक्षेच्या माध्यमातून क्रीडा विभागात सहाय्यक संचालक पदावर रुजू झाली तर तिचा बंधू **इंजि.निलेश साबळे** आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन स्पर्धेमध्ये जगात प्रथम आला आहे. **चि.अधिराज निंबाळकर** याने क्रीडा क्षेत्रामध्ये नैपुण्य मिळविले आहे. या सर्व यश मिळविलेल्या यशवंतांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. तसेच ही सर्व विद्वान मंडळी आपल्या तालुक्यातील आहे, याचाही मला सार्थ अभिमान वाटतो.

कान्हूर पठार येथील अन्न व औषधे क्षेत्रातील सल्लागार ॲड.पोपराव सोबले व इतर वयस्कर मंडळींचे या दरम्यानच्या कालावधीमध्ये निधन झाले, त्यांनी मी मंडळातर्फे आदरांजली अर्पण करतो.

या अंकातील '**आपण असे केले तर**' या सदराचे आपण जरूर अवलोकन करावे. त्यातून प्रेरणा घेऊन आपणही मंडळासाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. आपल्या मंडळासाठी **'विद्यार्थिनींचे वसतिगृहासाठी'** जागा घेण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात येण्यासाठी थोडाच कालावधी राहिला आहे, त्याचा विचार करुन देणगीदारांचा शोध घ्यावा अशी आपणास मी मंडळातर्फे विनंती करतो. सध्या थेरगाव येथील डांगे चौकात असलेले आपले विद्यार्थी वसतिगृह १००% क्षमतेने कार्यरत आहे. आपल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, यासाठी आपण सर्वांनी वसतिगृहाबद्दलची माहिती आपल्या गावामध्ये द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो. मंडळाचे काम **आदरणीय हौसाराम घोडके** यांच्या अध्यक्षतेखाली जोमाने सुरूच आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे गेली अनेक वर्षे **'संवाद'** जपण्याचे काम अव्याहरतपणे व निरपेक्ष भावनेने करणारे मंडळाचे सदस्य **श्री.सुनिल तोटे** यांनाही मी मंडळातर्फे धन्यवाद देतो!

संपादकीय जास्त न लांबवता **दि. ४ सप्टेंबर, २०२२ च्या 'गौरव सोहळ्या' साठी आपण न विसरता उपस्थित राहावे** असे परत एकदा आवाहन करून संपादकीयास अर्धविराम देतो.

जय जिजाऊ! जय शिवराय!!

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

# विद्यार्थी गौरव - १०वी


श्रेयस संतोष कुलकर्णी,
बाभुळवाडे ९७%


कु.श्रेया राजेंद्र ठाणगे,
करंदी ९३%


वेदांत अनिल वाघुंडे,
कान्हुर पठार ८९%


धनराज संदिप कारखिले,
राळेगण थेरपाळ ८६%


कु.राजश्री विलास पुजारी,
पुणेवाडी ८५%


सिद्धार्थ जयंत घोडके,
पारनेर ८३%


कु.नुपूर रामदास पुजारी,
पारनेर ८३%


कु.अरूंधती पोपट घुले,
पिंपळगाव रोठा ८२%


क्षितीज विजय खणकर,
बाभुळवाडे ५७%

# विद्यार्थी गौरव - १२वी सायन्स


कु.भक्ती अरविंद काळे,
सुपे ९०%


प्रांजल एकनाथ झावरे,
गारगुंडी ८५%


हर्षल अशोक घोरपडे,
चिंचोली ८५%


कु.संस्कृती सुधाकर औटी,
पारनेर ८३%


सिद्धेश सुनील पोटे,
बाभुळवाडे ८३%


ओम सोपान खोसे, पाडळी
दर्या ८२%


पियुश प्रशांत उंडे,
कर्जुले हरेश्वर ८१%


आदित्य पांडुरंग दिवटे,
रूई छत्रपती ८०%


सोहम सचिन चौधरी,
हिवरे कोरडा ८०%


कु.श्रेया राजेंद्र साळवे,
कान्हर पठार ७८%


कु.मैथिली विजयकुमार
मैड, सुपे ७३%


कु.श्रुती अविनाश
गाडीलकर, पळवे ७०%


सिद्धार्थ उत्तम डेरे,
वडगाव आमली ७०%


कु.साक्षी सुनील व्यवहारे,
कान्हुर पठार ६८%


उत्कर्ष संजय गागरे,
वनकुटे ६०%

# ग्रामस्थांचा सत्कार



* **श्री.राम नामदेव पठारे,** रा.पारनेर हे **डी.वाय.एस.पी.** पदावरून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर शांत न बसता त्यांनी **पी.एच.डी.**चा अभ्यास सुरू केला. त्यांना पुणे विद्यापीठाची **पी.एच.डी.** पदवी प्राप्त झाली. त्यांनी 'कॉमर्स अँड मॅनेजमेंट' मधील 'ऑर्गनायझेशनल मॅनेजमेंट' मध्ये '**टू स्टडी ऑर्गनायझेशन, मॅनेजमेंट अँड प्रॉब्लेम्स ऑफ व्हेरियस डिझास्टर इश्यूज विथ स्पेशल रेफरन्स टू टेररिस्टिक बॉम्ब ब्लास्टस् इन महाराष्ट्र**' या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ.डी.वाय पाटील स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे डॉ.ई.बी.खेडकर यांनी मार्गदर्शन केले.



* **सौ.स्नेहल प्रभात शिर्के,** रा.कर्जुले हरेश्वर या मॉडर्न विद्यालयामध्ये **प्राध्यापिका** म्हणून कार्यरत असून त्यांना जैव तंत्रज्ञानामध्ये मुंबई विद्यापीठातर्फे **पी.एच.डी.** पदवी प्रदान करण्यात आली.



* **आकृती डेव्हलपर्स चे बाळासाहेब करंजुले,** रा.पाडळी तर्फे रांजणगाव यांना केंद्र सरकारतर्फे दिला जाणारा **लोकमत रिअल इस्टेट विश्वकर्मा पुरस्कार मंत्री मा.नितीनजी गडकरी व मा.विजयजी दर्डा साो.** यांच्या हस्ते देण्यात आला.



* **डॉ.कुमारी बोध्यंगा संपतराव केदारे,** रा.वडनेर हवेली यांना प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स या अभिमत विद्यापीठातील जुन २०२१ रोजी झालेल्या **एम.डी.एस.** या मास्टर डिग्रीमध्ये **गोल्ड मेडल** मिळाले.



* **कु. वर्षा भाऊसाहेब साबळे,** रा.रूई छत्रपती हीची **सहाय्यक संचालक** क्रीडा स्पोर्टस् ॲथॉरिटी ऑफ इंडिया या पदावर **युपीएससी** मार्फत निवड झाली.



* श्री.बाळासाहेब गंगाराम सोनवणे, रा.निघोज यांच्या सुकन्या **सौ.स्वाती सुधीर कांबळे** या ('**आदर्श शिक्षिका**' पुरस्कार प्राप्त) पुणे जिल्हा परिषदेमध्ये मुख्याध्यापीका या पदावर कार्यरत असून दि.०५.०९.२०२१ च्या शिक्षक दिनानिमित्त त्यांचा लायन्स क्लब पुणे यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला.



* **श्री.हेमंत अनंत नागवडे,** रा.रुई छत्रपती हे शंभू महादेव ट्रस्टच्या भेकराई माता माध्यमिक विद्यालयात कला शिक्षक म्हणून कार्यरत असून त्यांची २०२१ ते २०२६ या कालावधीसाठी **पुणे जिल्हा कला शिक्षक संघटनेच्या कार्याध्यक्ष पदी** निवड झाली.



* **कु.निलेश भाऊसाहेब साबळे,** रा.रुई छत्रपती हा पुणे विद्यापीठामध्ये बी.ई. मेकॅनीकल विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाला होता. तसेच कोन क्रेन या इंटरनॅशनल कंपनीतर्फे घेतलेल्या संशोधन स्पर्धेमध्ये तो जगामध्ये प्रथम येऊन त्यास रू.८ लाखाचे पारीतोषिक मिळाले. गेट परीक्षेमध्ये त्याची ऑल इंडिया रँक ११४ आहे.



* यवतमाळ येथे झालेल्या **राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत अधिराज सुनील निंबाळकर आणि टीमचा प्रथम क्रमांक आला.** या स्पर्धेत एकूण ५४ संघांनी भाग घेतला होता. पुणे अमरावती अशा अंतीम लढतीत पुण्याच्या पाच खेळाडू असणाऱ्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला. विजयी संघाला राष्ट्रीय सामने खेळण्यासाठी पुढे संधी मिळाली आहे. विजयी प्रत्येक खेळाडूला सुवर्णपदक मिळाले आहे.

# नांदा सौख्य भरे

* श्री.राजेंद्र कचरदास घावटे, रा. जवळे यांचे सुपुत्र **चि.प्रतिक** व श्री.राजेंद्र भागवतराव काळवागे रा.शिंगवे, ता.राहाता यांची सुकन्या **सौ.ऋतुजा** यांचा शुभविवाह **दि.२७.१२.२०२१** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.घावटे** यांनी मंडळास **रू.११०१/-** देणगी दिली.

* श्री. सुनील रामराव सालके, रा.जवळे यांची सुकन्या **सौ. सुचेता** व श्री.बाळासाहेब दादासाहेब जगताप, रा.एरंडोली, ता.श्रीगोंदा यांचे सुपुत्र **चि. केतन** यांचा शुभविवाह दिनांक **१७.०४.२०२२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.सालके** यांनी मंडळास **रू ७,००१/-** देणगी दिली.



# कर्तृत्व पारनेरकरांचे

पारनेर तालुका मित्र मंडळाचे बांधकाम समिती अध्यक्ष **इंजि.विजयकुमार ठुबे साहेब** यांचा नुकताच १८ जुलै २०२२ रोजी सकाळ समुहातर्फे **''सकाळ आयडॉल महाराष्ट्र''** असा गौरव करण्यात आला. नगर येथे झालेल्या या देखण्या कार्यक्रमात नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक **डॉ.बी.जी.शेखर, अभिनेते मिलिंद शिंदे,** राज्याच्या आदर्श गाव संकल्प व प्रकल्प कृति समितीचे **कार्याध्यक्ष पोपटराव पवार** यांच्या हस्ते **इंजि.विजयकुमार ठुबे** यांचा सत्कार करण्यात आला.

इंजिनिअर विजयकुमार गोविंदराव ठुबे हे पारनेर तालुक्यातील कान्हुर पठार येथील जनता शिक्षण संस्थेचे संस्थापक व प्राथमिक शिक्षक **(कै.) गोविंदराव ठुबे** यांचे चिरंजीव. सन १९८२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये **सहाय्यक अभियंता** म्हणून ठुबे यांचा जीवनप्रवास सुरू झाला. या पदावर कर्जत, नगर, ठाणे, पुणे या ठिकाणी त्यांनी नोकरी करीत कामाचा ठसा उमटविला. नवनवीन संकल्पना राबवून अनेक प्रकल्प यशस्वीरित्या राबविले. पुढे बढती मिळत राज्याचे महत्वाचे खाते असलेल्या वखार महामंडळाच्या महाव्यवस्थापक पदी त्यांची नियुक्ती झाली. हे सर्व सुरू असताना समाजहिताचे काम सुरू ठेवले. **मराठा सेवा संघ, मराठा पतसंस्था,** तसेच आपल्या **पारनेर तालुका मित्र मंडळाच्या** माध्यमातून समाजासाठी सातत्याने पुढाकार घेत गरजवंतांना मदत, मार्गदर्शन केले व करत आहेत.

**इंजि. विजयकुमार ठुबे** यांचा प्रशासकीय कौशल्याची महाराष्ट्र शासनाने नोंद घेत त्यांना **'आदर्श अभियंता'** या सर्वोच्च राज्य पुरस्कार राज्यपाल **डॉ.व्ही.शंकरनारायण, मुख्यमंत्री अशोक चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार** यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. सन २०११ मध्ये **'महाराष्ट्र निर्माता'** हा पुरस्कार औरंगाबाद येथील तत्कालीन मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन २०१८ मध्ये नवी दिल्ली येथील **'इंडिया इंटरनॅशनल फ्रेंडशिप सोसायटी'** या संस्थेने मा.राज्यपाल यांच्या हस्ते राष्ट्रीय गौरव पुरस्कार दिला. स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील **''इंडीयन रोडस् काँग्रेस''** या संस्थेवर बंगळूर येथे सन २०१९ करीता **कौन्सील मेंबर** म्हणून त्यांची निवड झाली. ती महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरली. अशा अनेक कार्याची दखल घेत **इंजि.ठुबे** यांना सकाळ समुहातर्फे **''सकाळ आयडॉल महाराष्ट्र''** म्हणून गौरविण्यात आले. एक पारनेरकर म्हणून त्यांचा नेहमीच पारनेरकांना अभिमान वाटतो. त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# नांदा सौख्य भरे

* श्री.पोपटराव ज्ञानदेव कुंडलीक, रा.भाळवणी यांचे सुपुत्र **चि. सोहम** व श्री. मोहन निवृत्ती भोसले, रा.चऱ्होली बु.।। ता.हवेली यांची सुकन्या **सौ. श्रद्धा** यांचा शुभविवाह **दि.२४.०४.२०२२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.कुंडलीक** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.
* श्री.रंगनाथ लक्ष्मण शिर्के, रा.कर्जुले हरेश्वर यांचे सुपुत्र **चि.हर्षल** व श्री.तुकाराम नामदेव जगताप, रा.माहूर, ता.पुरंदर यांची सुकन्या **सौ.अनिता उर्फ प्रेरणा** यांचा शुभविवाह **दि.०४.०५.२०२२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.शिर्के** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.छबुराव विठ्ठल पांढरे, रा.गांजीभोयरे यांचे सुपुत्र **चि.अंकुश** व श्री.भाऊसाहेब आप्पासाहेब गुंडे, रा.चांदगव्हाण, ता.कोपरगाव यांची सुकन्या **सौ.वृषाली** यांचा शुभविवाह **दि.१४.०५.२०२२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.पांढरे** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.दिलीप किसन जाधव, रा.वेसदरे यांचे सुपुत्र **चि.ऋषिकेश** व श्री.हनुमंत काळुराम चौधरी, रा.मेदनकरवाडी, चाकण यांची सुकन्या **सौ.ऋतुजा** यांचा शुभविवाह **दि.१४.०५.२०२२** रोजी संपन्न झाला.
* श्री.बाळासाहेब सुखदेव बांदल, रा.पिंपरी गवळी यांची सुकन्या **सौ. कल्पना** व श्री.राजाराम किसनराव आगवाण, रा.नगर यांचे सुपुत्र **चि. सचिन** यांचा शुभविवाह दि. २०.०५.२०२२ रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.बांदल** यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.
* श्री.लक्ष्मण बाबुराव म्हस्के, रा.सांगवी सूर्या यांची सुकन्या **सौ. अंजली** व श्री.राजेंद्र शिवराम खोले, रा.तरडोबा वाडी, ता.शिरूर यांचे सुपुत्र **चि. अमित** यांचा शुभविवाह दिनांक २५.०५.२०२२ रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.म्हस्के यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.
* कै.प्रकाश झुंजारराव जगदाळे, रा.बाभुळवाडे यांचे सुपुत्र **चि.प्रशांत** व श्री.बापू मारुती तामखडे, रा.गांजीभोयरे यांची सुकन्या **सौ.छाया** यांचा शुभविवाह **दि.२७.०५.२०२२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.प्रमोद झुंजारराव जगदाळे** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.
* श्री.दत्तात्रय दौलतराव पठारे, रा.वाळवणे यांची सुकन्या **सौ. केतकी** व श्री.नितीन एकनाथराव पायमोडे, रा.कुडजे, ता.हवेली यांचे सुपुत्र **चि. राणा** यांचा शुभविवाह दिनांक **१६.०६.२०२२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.पठारे** यांनी मंडळास **रू.५,००१/-** देणगी दिली.

# सेवानिवृत्ती

* **प्राचार्य माधव पंढरीनाथ गायके,** रा.वासुंदे हे रयत शिक्षण संस्थेच्या सेवागीरी विद्यालय, कुसेगाव, ता.खटाव, जि.सातारा या विद्यालया मधून **प्राचार्य** पदावरून ३४ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०६.२०२१** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.गायके** यांनी **रू.५,०००/–** देणगी दिली आहे.



* **श्री. बाळासाहेब कोंडाजी झावरे,** रा.गारगुंडी हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लोहगाव, पुणे येथून **उपप्राचार्य** पदावरून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त श्री.झावरे यांनी **रू.२,००२/–** देणगी दिली आहे.



* **श्री. जयसिंग बाबुराव मापारी,** रा. राळेगण सिद्धी हे भारत सरकारच्या चित्रपट व दुरदर्शन संस्था, पुणे येथून **मेंटेनन्स इंजिनीयर** या पदावरून ३७ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.मापारी** यांनी **रू.१,०००/–** देणगी दिली आहे.



* **श्री. रामदास गवराम पुजारी,** रा. पारनेर हे महाराष्ट्र सरकारच्या वन विभागातून **सहाय्यक वनसंरक्षक** या पदावरून २७ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.पुजारी** यांनी **रू.३,५००/–** देणगी दिली आहे.



* **श्री. दत्तात्रय नामदेव गवळी,** रा.अपधुप हे पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागातून **निवड श्रेणी लघुलेखक** या पदावरून ३४ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.गवळी** यांनी **रू.१,०००/–** देणगी दिली आहे.



* **श्री. लक्ष्मण बाबुराव म्हस्के,** रा.सांगवी सुर्या हे भारत सरकारच्या संरक्षण खात्यातील गुणवत्ता आश्वासक नियंत्रणालय या विभागातून **अभियंता क्वालीटी अश्युरन्स** या पदावरून ३७ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.म्हस्के** यांनी **रू.१,०००/–** देणगी दिली आहे.



* **श्री. गजानन किसन ढोरमले,** रा. जातेगाव हे टाटा मोटर्स कंपनीतून ३२ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.ढोरमले** यांनी **रू.५,०००/–** देणगी दिली आहे.



* **श्री. भाऊसाहेब तुकाराम थोरात,** रा.पिंपरी गवळी हे सिद्धेश्वर शिक्षण मंडळ पिंपळगाव ता. दौंड या संस्थेच्या सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयामधून **मुख्याध्यापक** या पदावरून ३४ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.थोरात** यांनी **रू.१,०००/–** देणगी दिली आहे.



* **डॉ. बाळासाहेब नाथाजी वाफारे,** रा.कर्जुले हरेश्वर हे **पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परीषदेचे सदस्य** म्हणून कार्यरत होते. शिवाय ते गणित विषयाचे **पी.एच.डी.चे गाईड** म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १३ विद्यार्थ्यांना पी.एच.डी.पदवी प्राप्त झाली. ३६ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२२** रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.वाफारे** यांनी **रू.११,०००/–** देणगी दिली आहे.



* **डॉ. दत्तात्रय तुकाराम ठुबे,** रा.कान्हुर पठार हे महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागातून **सचीव** या पदावरून ३३ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०६.२०२२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त **श्री.ठुबे** यांनी **रू.११,०००/–** देणगी दिली आहे.



# आपण असे केले तर



* **श्री. अमृतराव क्षीरसागर,** रा. जामगाव यांनी त्यांचे जेष्ठ बंधू **कै.जयवंतराव बळवंतराव क्षीरसागर** यांचे **दि. ०२.०३.२०२२** च्या स्मृती दिना निमित्त मंडळास **रु.११०००/-** देणगी दिली.



* **पिताश्री वै. सखाराम मारुतराव जगताप** (मृत्यु दिनांक ०६.०१.२०११) **व मातोश्री वै. विजयाबाई सखाराम जगताप** (मृत्यु दिनांक ०३.१०.२०१२) रा. गोरेगाव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री.संदिप व श्री.सचिन यांनी मंडळास **रु.२०००/-** देणगी दिली.



* **कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या **दि.०८.०८.२०२२** च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



* **कै.अरूण फकिरा हरेल**, रा.हिवरे कोरडा यांच्या **दि.०७.०७.२०२२** च्या स्मृतीदिनाप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.तुषार** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



* **श्री. पराग पंढरीनाथ शेळके,** रा.हत्तलखिंडी यांनी त्यांच्या आजी **कै.बबईताई काशिनाथ शेळके** यांच्या दि.०२.०६.२०२२ रोजीच्या स्मृतीदिना निमित्त मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



* **श्री. मधुकर हौशाभाऊ शिरोळे,** रा.पाडळीदर्या यांनी त्यांचे नातू **कु.रूद्र मुकुंद नेहरकर** यांच्या दि.३०.०५.२०२२ रोजीच्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



* **श्री. कुंडलीक सुखदेव पोटे,** रा. बाभुळवाडे यांच्या दि. ०२.०६.२०२२ रोजीच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.सुनील व डॉ.योगेश यांनी मंडळास **रु.५०००/-** देणगी दिली.



* **श्री. अशोक दगडुरामजी कटारिया,** रा. तिखोल यांनी **मातोश्री स्व.झनकुबाई दगडुरामजी कटारिया** यांच्या दि.०९.०५.२०२२ रोजीच्या स्मृतिदिना निमित्त मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



* **कै.बाळासाहेब किसनराव मदगे,** रा.म्हसे यांच्या दि.२३.०६.२०२२ च्या स्मृती दिनानिमित्त पत्नी श्रीमती **सुशिलाबाई बाळासाहेब मदगे** यांनी मंडळास **रू.३०००/–** देणगी दिली.



* **श्री. सुरेश रघुनाथ काळे,** रा.पिंपरी जलसेन यांनी मातोश्री **कै.सौ.इंद्रायणी काळे** व पिताश्री **कै.रघुनाथ काळे** यांचे **स्मरणार्थ** मंडळास **रू.५०००** देणगी दिली.



* **कै. सदाशिव किसन शिंदे व कै. श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे आडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.प्रविण** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



* **कै.सौ. सुशिला मारूती पोटघन,** रा. जातेगाव यांच्या दि.१७.०८.२०२२ रोजीच्या स्मृतीदिना-निमित्त सुपुत्र **अविनाश** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

## अभिनंदन !



* अहमदनगर पुणे व नाशिक जिल्ह्यात सेवाकार्यात अग्रेसर असलेल्या भोसरी येथील **लायन्स क्लब पुणे भोजापुर गोल्ड** च्या २०२१–२२ च्या अध्यक्षपदी पाडळी–रांजणगाव च्या **सौ.जयश्री मुरलीधर साठे** यांची बिनविरोध निवड झाली.



* **कु.अभिकेश तुकाराम झावरे,** रा. गारगुंडी याने हॉटेल मॅनेजमेंटमध्ये पदवी संपादन केली असून तो नॅशनल कॉम्पीटीशन ऑफ कलीनरी (कुकींग) या स्पर्धेमध्ये ऑल इंडिया लेव्हलमध्ये ५व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला होता. आता त्याची अमेरीकेतील पंचतारांकीत हॉटेलमध्ये **कॉन्टीनेंटल शेफ** या पदावर नियुक्ती झाली आहे.



* **कु.संस्कृती पोपट केदार,** रा.शहाजापूर हिची एम.बी.बी.एस.च्या पहिल्या वर्षासाठी गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज, मिरज येथे गुणानुक्रमांकाने निवड झाली.

# निधन वार्ता



* **पोपटराव बाबाजी भागवत,** वय ८७ वर्षे, रा.कान्हुर पठार यांचे दिनांक **१९.०२.२०२१** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कन्या **सौ.लता बबनराव मुळे,** रा.कारेगाव यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



* **उत्तमचंदजी रामचंदजी कर्नावट,** वय ८६ वर्षे, रा.खडकवाडी यांचे दिनांक **३०.११.२०२१** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पत्नी **श्रीमती सुमनताई** यांनी मंडळास **रू.१,१००/-** देणगी दिली.



* **किसनराव धोंडीबा गोरडे,** वय ९२ वर्षे, रा.लोणी मावळा यांचे दिनांक **२२.१२.२०२१** रोजी निधन झाले.



* **कचरदास धनराजजी कटारीया,** वय ९६ वर्षे, रा.राळेगण थेरपाळ यांचे दिनांक **१६.०२.२०२२** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सुपूत्र **श्री.चंद्रकांत** यांनी मंडळास **रू.१,००१/-** देणगी दिली.



* **ॲड.पोपटराव भिकाजी सोबले,** वय ६९ वर्षे, रा.कान्हुर पठार यांचे दिनांक **०७.०४.२०२२** रोजी निधन झाले.



* **बबन सुखदेव खोसे,** वय ७६ वर्षे, रा.पाडळी दर्या यांचे दिनांक **१७.०४.२०२२** रोजी निधन झाले.



* **विष्णू राणू वराळ,** वय ८६ वर्षे, रा.वडझिरे यांचे दिनांक **०७.०७.२०२२** रोजी निधन झाले.



* पारनेर तालुका मित्र मंडळाचे सक्रीय सदस्य श्री.भाऊसाहेब नरड सर यांचे पिताश्री **गंगाराम नामदेव नरड,** वय ९५ वर्षे, रा. कासारे यांचे दिनांक **०३.०८.२०२२** रोजी निधन झाले.

## कोरोनापासून वाचण्यासाठी ....

**S** **सोशल डिस्टंन्सींगचे पालन करा.**
**M** **मास्कचा वापर करा.**
**S** **सॅनीटायझरचा वापर करा किंवा साबणाने हात किमान २० सेकंदापर्यंत स्वच्छ धुवा.**

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ |
| प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| श्री.किरण तिकोणे | सदस्य | ९८२२३४६१३८ |
| श्री.प्रमोद जगदाळे | सदस्य | ९५७९६७४८१७ |
| श्री. राजाराम मुंढे | सदस्य | ९५२७४४५७५७ |
| श्री.प्रशांत शिर्के | सदस्य | ९८६०५८५७८१ |

## वसतिगृह प्रवेश

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, गल्ली नं. ८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे असून प्रवेशासाठी संपर्क साधावा.**

**श्री.प्रमोद देशपांडे - ७५०७०६४५८८ श्री.दयानंद पतंगे - ९५७९८७०८३९**

।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर
/९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा.
सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११९५५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये-

✣ संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय ✣ तत्पर सेवा ✣ ठेवीवर आकर्षक व्याजदर
✣ सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार ✣ विनयशील कर्मचारी वर्ग
✣ सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
संस्थापक अध्यक्ष




श्री.अरुण मार्तंड नरसाळे
अध्यक्ष



श्री.कुंडलिक विश्वनाथ घोडके
उपाध्यक्ष



श्री.पोपटराव आनंदराव जाधव
संचालक



श्री.गोविंद दामोधर ढोरमले
संचालक



श्री.निशांत रंगनाथ गिरी
संचालक



श्री.सोमा भिमा दाते
संचालक



सौ.अलका दिलीप हरेल
संचालिका



श्रीमती राधाबाई मुरलीधर चौधरी
संचालिका

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०२१ ते ३१.०३.२०२२ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | | वैद्यकीय मदत | १५,०००.०० | |
| रोख | १,६८७.०० | | लिहीणावळ खर्च | १२,५००.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१२ | ५,३८७.०० | | बँक चार्जेस | १,६२०.३३ | |
| स्टेट बँक ४९७८ | ७,२८,६७२.०० | | सफाई खर्च | ३१,९७८.०० | |
| महानगर को–ऑप.बँक १६१ | ८,९१,५८३.३५ | | मासिक छपाई – संवाद | १५,२६०.०० | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | २,७९,७४१,४७ | | एन.ए.टॅक्स | ८१६.०० | |
| | ---------- | १९,०७,०७०.८२ | इलेक्ट्रीकल खर्च | ८,६४०.०० | |
| | | | वीजबील खर्च | २,२४,०५०.०० | |
| | | | उत्सव समारंभ खर्च | ३,०७०.०० | |
| | | | इंटरनेट चार्जेस | १,१२,७००.०० | |
| बचत ठेव व्याज खाते | | १०,५८४.०० | मेडिकल चार्जेस | ७००.०० | |
| मुदत ठेव व्याज खाते | | १,८१,६६१.०० | मासिक सभा खर्च | १,६०५.०० | |
| वसतिगृह शुल्क | | १९,५४,३५०.०० | ऑफिस खर्च | १०,६१७.०० | |
| फॉर्म फी | | ५,७२०.०० | छपाई व स्टेशनरी खर्च | ७,२५०.०० | |
| वसतिगृह दंड | | २५,९४०.०० | प्रोफेशनल चार्जेस | १७,५००.०० | |
| वसतिगृह विज बिल जमा | | १४,३४२.०० | देखभाल व दुरुस्ती खर्च | ४९,४४६.०० | |
| अभ्यासिका फी | | ३८,९००.०० | प्रवास खर्च | २४,२००.०० | |
| | | | टायपींग चार्जेस | ३,५००.०० | |
| | | | पाणी टँकर खर्च | ९००.०० | |
| इमारत निधी | | ९,३९,४६८.०० | टपाल खर्च | २३.०० | |
| किरकोळ जमा | | ५६.०० | झेरॉक्स खर्च | १,०१०.०० | |
| | | | वेबसाईट खर्च | ९,०००.०० | |
| | | | पगार खर्च | ५,०५,२००.०० | |
| **अनामत –** | | | | -------- | १०,५६,५८५.३३ |
| सचिन औटी | | २,१००.०० | पी.सी.एम.सी.कर | | ४४,१२५.०० |
| | | | पाणीपट्टी कर | | १,५०७.०० |
| वसतिगृह अनामत (डिपॉझीट) | | ३,७८,५००.०० | ऑडिट फी | | १५,०००.०० |
| | | | वकिल फी | | १,४००.०० |
| | | | व्याज येणे | | १,१४,१८८.०० |
| | | | वसतीगृह अनामत (डिपॉझीट) | | २.४१.५००.०० |
| मुदत ठेव जमा | | ११,४८,७१४.०० | **अनामत** | | |
| | | | ब्रजमोहन | | २,०००.०० |
| | | | स्वप्निल ठाणगे | | २००.०० |
| | | | गोपाल थापा | | ५००.०० |
| | | | मुदत ठेव | | ४५,९८,०१९.०० |
| | | | खुर्ची खरेदी | | ३५,५१८.०० |
| | | | टी.डी.एस. २०२१–२०२२ | | १८,१६८.०० |
| | | | **अखेर शिल्लक** | | |
| | | | रोख | १०,१०७.०० | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१२ | ५,५३७.०० | |
| | | | स्टेट बँक २०७५४ | ११,२५२.४७ | |
| | | | सुवर्णयुग सह.बँक १७७० | १,५०,१७०.३५ | |
| | | | महानगर को–ऑप.बँक ४४५ | २,९६,१३८.०० | |
| | | | महानगर को–ऑप.बँक १६१ | ५,४९०.६७ | |
| | | | | --------- | ४,७८,६९५.४९ |
| **एकूण रक्कम** | | **६६,०७,४०५.८२** | **एकूण रक्कम** | | **६६,०७,४०५.८२** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०२१ ते ३१.३.२०२२ अखेरचे

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| वैद्यकीय मदत | १५,०००.०० | | बचत ठेव व्याज खाते | १०,५८४.०० | |
| लिहिणावळ खर्च | १२,५००.०० | | मुदत ठेव व्याज खाते | १,८१,६६१.०० | |
| बँक चार्जेस | १,६२०.३३ | | | ------- | १,९२,२४५.०० |
| सफाई खर्च | ३१,९७८.०० | | | | |
| मासिक छपाई : संवाद | १५,२६०.०० | | वसतिगृह शुल्क | १९,५४,३५०.०० | |
| एन.ए.टॅक्स | ८१६.०० | | फॉर्म फी | ५,७२०.०० | |
| इलेक्ट्रीकल खर्च | ८,६४०.०० | | वसतिगृह दंड | २५,९४०.०० | |
| वीजबील खर्च | २,२४,०५०.०० | | वसतिगृह विज बिल जमा | १४,३४२.०० | |
| उत्सव समारंभ खर्च | ३,०७०.०० | | अभ्यासिका फी | ३८,९००.०० | |
| इंटरनेट चार्जेस | १,१२,७००.०० | | | ---------- | २०,३९,२५२.०० |
| मेडिकल खर्च | ७००.०० | | | | |
| मासिक सभा खर्च | १,६०७.०० | | | | |
| ऑफिस खर्च | १०,६१७.०० | | किरकोळ जमा | | ५६.०० |
| छपाई व स्टेशनरी खर्च | ७,२५०.०० | | | | |
| प्रोफेशनल चार्जेस | १७,५००.०० | | | | |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | ४९,४४६.०० | | | | |
| प्रवास खर्च | २४,२००.०० | | | | |
| टायपींग चार्जेस | ३,५००.०० | | | | |
| पाणी टँकर खर्च | ९००.०० | | | | |
| टपाल खर्च | २३.०० | | | | |
| झेरॉक्स खर्च | १,०१०.०० | | | | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | | | | |
| पगार खर्च | ५,०५,२००.०० | | | | |
| | -------- | १०,५६,५८५.३३ | | | |
| पी.सी.एम.सी.कर | ४४,१२५.०० | | | | |
| पाणीपट्टी कर | १,५०७.०० | | | | |
| | -------- | ४५,६३२.०० | | | |
| ऑडिट फी | | १५,०००.०० | | | |
| वकिल फी | | १,४००.०० | | | |
| घसारा इमारत | | ८,५५,२२८.०० | | | |
| घसारा फर्निचर | | २,१२,३०२.०० | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | ४५,४०५.६७ | | | |
| **एकूण रक्कम** | | **२२,३१,५५३.००** | **एकूण रक्कम** | | **२२,३१,५५३.००** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत**
**म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !**
**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा,**
**आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०२२ अखेरचे

| जिंदगी व देणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० |
| **इतर निधी** | | |
| **इमारत निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | २,११,९०,४४०.०३ | |
| अधिक जमा – चालू वर्षी | ९,३९,४६८.०० | |
| | ------------ | २,२१,२९,९०८.०३ |
| **शैक्षणिक फंड –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० |
| **अंत्यविधी जमा निधी –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० |
| **घसारा निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १८,४७,८६१.०० | |
| अधिक जमा–चालू वर्षी | ८,५५,२२८.०० | |
| | ---------- | २७,०३,०८९.०० |
| **वसतिगृह अनामत –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,४०,९५६.०० | |
| अधिक जमा – चालू वर्षी | ३,७८,५००.०० | |
| | ---------- | |
| | ७,१९,४५६.०० | |
| वजा – चालू वर्षी | २,४१,५००.०० | |
| | ---------- | ४,७७,९५६.०० |
| **उत्पन्न खर्च खाते –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ९,५५,३४८.७९ | |
| अधिक चालू वर्षी नफा | ४५,४०५.६७ | |
| | ----------- | १०,००,७५४.४६ |
| **पुढील पानावर...** | | |

| स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **स्थिर मालमत्ता** | | |
| **जमीन खरेदी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| **इमारत बांधकाम** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,८९,५२,४१६.०० |
| **फर्निचर व फिक्चर्स –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १६,१३,३३८.०० | |
| अधिक जमा चालू वर्षी | ३५,५१८.०० | |
| ३० सप्टें.नंतर | -------- | |
| | १६,४८,८५६.०० | |
| वजा – घसारा १०% | १,६३,११०.०० | |
| | --------- | १४,८५,७४६.०० |
| **लॅपटॉप** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १०,५०९.०० | |
| वजा घसारा – ४०% | ४,२०४.०० | |
| | ------- | ६,३०५.०० |
| **मोटर पंप –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ५,६१८.०० | |
| वजा घसारा – ४०% | २,२४७.०० | |
| | ------- | ३,३७१.०० |
| **प्रिंटर** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,१६७.०० | |
| वजा घसारा – ४०% | १,२६७.०० | |
| | ------- | १,९००.०० |
| **सोलर सिस्टीम** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ९९,२८८.०० | |
| वजा घसारा – ४०% | ३९,७१५.०० | |
| | ------- | ५९,५७३.०० |
| **वॉटर मीटर** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,६००.०० | |
| वजा घसारा – ४०% | १,४४०.०० | |
| | ------- | २,१६०.०० |
| **वॉटर प्युरिफायर खरेदी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७९७.०० | |
| वजा – घसारा ४०% | ३१९.०० | |
| | ------- | ४७८.०० |
| **मुदत ठेव** | | |
| महानगर बँक RID/२०१/१ | ३,४६,०९६.०० | |
| महानगर बँक RID/२०१/२ | ४,२६,७२१.०० | |
| महानगर बँक RID/२०१/३ | ४,२५,२०२.०० | |
| महानगर बँक RID/२०१/५ | ४,००,०००.०० | |
| महानगर बँक RID/२४९/१ | ४,००,०००.०० | |
| स्टेट बँक ४०२०१६००९५५ | ५,००,०००.०० | |
| स्टेट बँक ४०२०१६०२०७८ | ८,००,०००.०० | |
| स्टेट बँक ४०४४७४२५२७९ | ५,००,०००.०० | |
| स्टेट बँक ४०५३८१८०१२० | ५,००,०००.०० | |
| स्टेट बँक ४०८६५९३६८१० | ३,००,०००.०० | |
| | --------- | ४५,९८,०१९.०० |
| **पुढील पानावर...** | | |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०२२ अखेरचे


| जिंदगी व देणी | रक्कम रू. | रक्कम रू. | स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **मागील पानावरून ...** | | | **मागील पानावरून...** | | |
| | | | **एम.एस.सी.बी. डिपॉझिट –** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| | | | **पी.सी.एम.सी.डिपॉझिट (बांधकाम)** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| | | | **अनामत ब्रजमोहन** | | |
| | | | चालू वर्षी | | २,०००.०० |
| | | | **अनामत गोपाल थापा** | | |
| | | | चालू वर्षी | | ५००.०० |
| | | | **अनामत स्वप्निल ठाणगे** | | |
| | | | चालू वर्षी | | २००.०० |
| | | | **वृक्ष संवर्धन ठेव** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| | | | **पाणी कनेक्शन डिपॉझिट** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| | | | **टी.डी.एस. २०२०–२१** | | ३,८१८.०० |
| | | | **टी.डी.एस. २०२१–२२** | | १८,१६८.०० |
| | | | व्याज येणे | | १,१४,१८८.०० |
| | | | **रोख व बँक शिल्लक –** | | |
| | | | रोख | १०,१०७.०० | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१२ | ५,५३७.०० | |
| | | | स्टेट बँक २०७५४ | ११,२५२.४७ | |
| | | | सुवर्णयुग सह.बँक १७७० | १,५०,१७०.३५ | |
| | | | महानगर को–ऑप.बँक ४४५ | २,९६,१३८.०० | |
| | | | महानगर को–ऑप.बँक १६१ | ५,४९०.६७ | |
| | | | | --------- | ४,७८,६९५.४९ |
| **एकूण रक्कम** | | **२,६६,११,८४८.४९** | **एकूण रक्कम** | | **२,६६,११,८४८.४९** |

**सुनील पोटे** — सेक्रेटरी

**मधुकर शिरोळे** — उपाध्यक्ष

**हौसाराम घोडके** — अध्यक्ष

**मे.के.बी.साळुंके अँड कं.** — लेखा परीक्षक




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.सुनील कुंडलीक पोटे व मुद्रक श्री.सुनील मुरलीधर तोटे (suniltote11@gmail.com) (M: 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून **'पारनेर भवन', मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३** येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०